# आरोग्य सुविधा हीच ईश्वर सेवा

## नवजात अर्भक अतिदक्षता विभागाचे पालकमंत्र्यांच्या हस्ते उद्‌घाटन

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. ५ -** पैशांअभावी गरीब कुटुंबातील लोक उपचार घेण्यासाठी रुग्णालयात जायला टाळाटाळ करतात. त्यासाठी पैशाचा अपव्यय होणार नाही याची काळजी घेऊन सर्वसामान्यांच्या आरोग्य सेवेसाठी आवश्यक असणाऱ्या सर्व सुविधा पुरवणे हीच खरी ईश्वर सेवा आहे, असे मत पालकमंत्री गिरीश बापट यांनी शनिवारी व्यक्त केले.



**पुणे : कै.चंदूमामा सोनवणे प्रसूतिगृह,भवानीपेठ येथे नवजात शिशु विभागाचे उद्‌घाटन पालकमंत्री गिरीश बापट यांच्या हस्ते शनिवारी झाले.**

येरवडा येथील राजीव गांधी रुग्णालय आणि भवानी पेठेतील चंदूमामा सोनावणे प्रसुतिगृह या महापालिकेच्या दवाखान्यांमध्ये नवजात शिशुंसाठी सुरू केलेल्या अतिदक्षता विभागांचे उद्‌घाटन बापट यांच्या हस्ते झाले. मुकुल माधव फाउंडेशनच्या सामाजिक दायित्वातून दोन्ही विभाग विकसित करण्यात आले आहेत.

यावेळी महापौर मुक्ता टिळक, उपमहापौर डॉ. सिद्धार्थ धेंडे, स्थायी समितीचे अध्यक्ष योगेश मुळीक, सभागृह नेते श्रीनाथ भिमाले, आमदार जगदीश मुळीक, शिवसेनेचे गटनेते संजय भोसले, अविनाश बागवे, मनिषा लडकत, अर्चना पाटील, अश्विनी लांडगे आदी नगरसेवक आयुक्त सौरभ राव, माजी आयुक्त कुणाल कुमार, सहायक आरोग्य अधिकारी डॉ. अंजली साबणे, मुकुल माधव फाउंडेशनचे प्रकाश छाब्रिया, रितु छाब्रिया यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रसुती दरम्यान गुंतागुंत झाल्यास आई आणि बाळाच्या जीवाला धोका निर्माण होतो. यावेळी अतिदक्षता विभागातील उपचारांची गरज असते. यासाठी या दोन्ही रुग्णालयांत नवजात शिशुंसाठी प्रत्येकी १२ युनिटचे अतिदक्षता विभाग विकसित करण्यात आले आहेत. त्यामुळे वेळेवर उपचार करता येणार आहेत, असे टिळक म्हणाल्या.

श्वसनाला होणारा त्रास, हृदयाचे आजार, दुर्बलता यासाठी आवश्यक असणारे उपचार या ठिकाणी करता येतील. त्यासाठी ७४ लाख रुपये खर्च करून व्हेंटिलेटरसारखी अत्यावश्यक उपकरणे बसविण्यात आली आहेत. दोन्ही विभाग विकसित करण्यासाठी ९८ लाख रुपयांचा खर्च करण्यात आल्याचे टिळक म्हणाल्या.

केईएम रुग्णालयासाठी जमीन दान करणाऱ्या यशवंत मुदलीयार आणि दगडूशेठ हलवाई गणपती मंडळाचे अध्यक्ष अशोक गोडसे यांचा विशेष सत्कार करण्यात आला. नगरसेविका मनिषा लडकत यांनी सूत्रसंचालन केले.